# प्रधानमंत्री उज्वला योजना

कोणासाठी उपयोगी – देशभरातील दारिद्र्यरेषेखालील (**BPL-Below Poverty Line**) ५ कोटी घरांमध्ये **LPG** गॅस कनेक्शन देण्यासाठी ही योजना आखण्यात आली आहे. जळाऊ लाकडांच्या सहाय्याने चुलीवर स्वयंपाक करणाऱ्या महिलांच्या डोळ्यांना होणारा अपाय रोखणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. सामान्य आर्थिक परिस्थितीतील कुटुंबाचे जीवनमान उंचावण्याचा, त्यांच्या आयुष्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न आहे.

योजनेची माहिती –

- ही योजना दारिद्र्यरेषेखालील **BPL** (बिलो पॉव्हर्टी लाईन) असलेल्या कुटुंबातील महिलांसाठी आहे.
- या योजनेत वयाची १८ वर्षे पूर्ण असलेल्या कोणत्याही महिलेला अर्ज करता येतो. अर्जाबरोबर पुढील कागदपत्र देणे आवश्यक.
  - **BPL** सर्टिफिकेट (ग्रामपंचायतीचा सरपंच किंवा नगर परिषदेचा चेअरमन यांनी प्रमाणित केलेले)
  - **BPL** रेशनकार्ड
  - एक फोटो ओळखपत्र (आधारकार्ड किंवा मतदार ओळखपत्र)
  - एक पासपोर्ट आकाराचा फोटो
  - बँक खात्याचा तपशील
- या योजनेचा दोन पानी अर्ज कोणत्याही **LPG** गॅस वितरकाकडे उपलब्ध आहे. तो भरुन तेथेच देता येतो. अर्जामध्ये आपली सर्व माहिती देऊन आपल्याला १४.२ किलोचा की ५ किलोचा सिलेंडर पाहिजे हे नमूद करणे आवश्यक आहे.
- या योजनेत पात्र होण्यासाठी अर्जदाराचे नाव **SECC-2011** म्हणजेच २०११ साली झालेल्या सामाजिक आर्थिक जातीनिहाय जनगणनेच्या यादीत असले पाहिजे. या जनगणनेच्या यादीत नाव असलेल्या व्यक्तींनाच या योजनेचा लाभ मिळेल.
- या योजनेत सहभागी होण्यासाठी आपले राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे. खाते नसल्यास असे खाते उघडून मगच अर्ज करावा.
- या योजनेत दारिद्र्य रेषेखालील प्रत्येक घरासाठी रु.१६००/- इतके आर्थिक सहाय्य मंजूर होते. या योजनेचा लाभ त्या घरातील स्त्रीच्या नावानेच दिला जातो. शेगडी मासिक हप्त्यावर उपलब्ध करुन दिली जाते.
- ही योजना २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ या आर्थिक वर्षांसाठीच लागू आहे.

**www.pmujjwalayojana.in**

***

# प्रधानमंत्री आवास योजना

कोणासाठी उपयोगी – कमी उत्पन्न गट (LIG) आणि आर्थिक दुर्बल घटक (EWS) या घटकातील व्यक्तींना स्वत:चे घर खरेदी करता यावे यासाठी केंद्र सरकारने सबसीडी –आर्थिक मदत उपलब्ध करुन देऊन त्यांना परवडणाऱ्या दरातील घरे (**Affordable Housing**) उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना आखली आहे. या वर्गातील सुमारे २ कोटी कुटुंबांना स्वत:चे घर घेण्याची आर्थिक क्षमता आज नाही असे वास्तव आहे. या योजनेत  सर्व जाती धर्माच्या नागरिकांचा समावेश केला आहे. मा.प्रधानमंत्र्यांनी घोषणा केल्याप्रमाणे २०२२ पर्यंत प्रत्येक भारतीयाला घर असावे असे नियोजन केले आहे. एकूण दोन कोटी घरे बांधण्याची योजना आहे.

योजनेची माहिती –

- या योजनेचा लाभ प्राधान्याने सर्व जाती, धर्माच्या भारतीय नागरीक महिलांच्या कुटुंबियांना मिळेल. घर महिलेच्या नावानेच नोंदवले जाईल.
- कमी उत्पन्न गटातील व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील लोकांना तसेच मागासवर्गीय जाती (**SC**)  व जमाती (**ST**) ना प्राधान्य मिळेल.
- २०१५-२०१७ या दोन आर्थिक वर्षात १०० शहरांना नंतरच्या टप्प्यात २०१७ ते २०१९ या दोन आर्थिक वर्षात आणखी २०० शहरांना आणि २०१९ ते २०२२ या तीन आर्थिक वर्षात उर्वरित सर्व ठिकाणी ही योजना लागू होईल. भारतातील सर्व गरजू लोकांना २०२२ पर्यंत घर देण्याची योजना आहे.
- अल्प उत्पन्न व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील लोकांसाठी घर खरेदीवर केंद्र सरकार रु.१ लाख ते रु.२.३० लाखापर्यंतची आर्थिक मदत (**subsidy**)  देणार आहे. यामुळे या गटातील लोकांना घर घेणे शक्य होईल अशी योजना आहे.
- या बरोबरीने घर खरेदीसाठी घेतलेल्या कर्जावर (गृहकर्ज) ६.५% व्याजाची रक्कम आर्थिक मदत (**subsidy**) म्हणून देण्यात येईल. ही सबसीडी गृहकर्ज दिल्याच्या तारखेपासून १५ वर्षे मुदतीपर्यंत मिळत राहील.
- या योजनेत आर्थिक मदत मंजूर करताना महिलांना विशेष प्राधान्य दिले जाईल. त्यांचे अर्ज प्राधान्याने मंजूर करण्यात येतील.
- वयस्कर व दिव्यांग व्यक्तींना तळमजल्यावरील घरे घेण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.
- स्वत:चे घर बांधण्यासाठी किंवा नूतनीकरण करण्यासाठी आर्थिक दुर्बल घटकाच्या (**EWS**) लोकांसाठी ३० स्क्वेअर मीटरचे घर व कमी उत्पन्न गट (**LIG**)  साठी ६० स्क्वेअर मीटरच्या घरासाठी या योजनेअंतर्गत कर्ज उपलब्ध होईल.

***

# सुकन्या समृध्दी योजना (SSY)

कोणासाठी उपयोगी - मुलींच्या आयुष्यातील शिक्षणाच्या व लग्नाच्या खर्चासाठी मुलीच्या लहानपणापासून बचत करुन सर्वसामान्य आर्थिक परिस्थितीतील कुटुंबांना सहाय्यकारी असलेली योजना.

योजनेची माहिती -

- मुलीच्या जन्मापासून मुलगी १० वर्षांची होईपर्यंत या योजनेचे खाते राष्ट्रीयकृत व अन्य निर्देशीत बँकांमध्ये उघडता येते. उदा. **ICICI, AXIS, IDBI** इ.
- आकर्षक ८.६% व्याजदर व्याज वार्षिक पध्दतीने दिले जाते. वर्षाला चक्रवाढ पध्दतीने व्याजावर व्याज **(Compounding)** देखील मिळते. यामुळे आपण भरलेल्या रकमेत भरघोस वाढ होते.
- या खात्यात भरलेल्या रकमेवर इन्कमटॅक्स मध्ये कलम **80(C)** प्रमाणे सूट उपलब्ध. **80(C)** कलमाच्या सध्या असलेल्या १.५० लाख या सुटीच्या मर्यादेत या खात्यात भरलेल्या रकमेची सूट मिळते.
- या योजनेतील खात्यात भरलेले पैसे मुलगी १८ वर्षांची झाल्याशिवाय काढता येत नाहीत. १८ वर्षे पूर्ण झाल्यावर आधीच्या वर्षापर्यंतच्या जमा रकमेच्या ५०% रक्कम काढता येते. २१ वर्षे पूर्ण झाल्यावर संपूर्ण रक्कम व्याजासह परत मिळते. १८ व्या वर्षी मुलीचे लग्न झाल्यास खाते मुदतपूर्व बंद करता येते. यामुळे या रकमेचा उपयोग मुलीच्या शिक्षण व लग्नासाठीच होतो.
- एका खात्यात दर आर्थिक वर्षात किमान रु.१०००/- व कमाल रु.१,५०,०००/- भरता येतात. वरील रक्कम एका वर्षात वेळोवेळी मिळून भरता येते. प्रती वर्षी किमान रु.१०००/- भरणे सक्तीचे आहे. न भरल्यास रु.५०/- दंड लावून व किमान रक्कम रु.१०००/- भरुन खाते नियमित करता येते.
- खाते उघडताना मुलगी लहान असल्याने कायदेशीर पालक / नैसर्गिक पालक (आई-वडील) मुलीच्या नावाने खाते उघडू शकतो. प्रत्येक पालकाला एका मुलीचे एकच व जास्तीत जास्त दोन मुलींचे खाते उघडता येते.
- लागणारे कागदपत्र - बँकांच्या **KYC (Know Your Customer)** नियमानुसार लागणारे सर्व कागदपत्र (उदा.फोटो, ॲड्रेस प्रूफ, पॅनकार्ड, फोटो आयडी, माहितीचा फॉर्म इ.) व मुलीचा जन्मतारखेचा दाखला.
- मुलीच्या भविष्यातील खर्चांची - उदा. उच्च शिक्षण, लग्न वगैरे तरतूद सहजपणे होऊन जाते. शिवाय अन्य कोणत्याही कारणाने पैसे काढता येत नाहीत. त्यामुळे या पैशांचा उपयोग फक्त मुलीच्या शिक्षण व लग्नासाठीच होतो.

***

# प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

कोणासाठी उपयोगी – शारीरिक कष्टाची व अपघाताची शक्यता असलेली कामे करणाऱ्या कष्टकरी वर्गातील कष्टकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना अत्यंत उपयुक्त अशी ही अपघात विमा योजना **(Accidental Insurance)**. शेतमजूर, असंघटीत क्षेत्रातील पुरुष व महिला कामगार, रिक्षा व टॅक्सीचालक, डिलीव्हरी बॉय, ट्रक ड्रायव्हर यांना अचानक ॲक्सीडेंट झाल्यास त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना किमान आर्थिक सहाय्य मिळावे या दृष्टीने योजना आखली आहे.

योजनेची माहिती –

- अत्यंत अल्प प्रिमीयममध्ये उपलब्ध केलेली पहिलीच अपघात विमा योजना. वार्षिक फक्त रु.१२/– (प्रती महिना एक रुपया) एवढा माफक प्रिमियम.
- विम्याचा कालावधी प्रती वर्षी १ जून ते ३१ मे असा आहे.
- १८ ते ७० वयोगटातील कोणत्याही बँकेत बचत खाते असणारा कोणीही बँक ग्राहक या योजनेत सहभागी होउ शकतो. स्वत:चा विमा उतरवू शकतो.
- विमा कालावधी एक वर्षाचा असल्याने प्रती वर्षी रिन्यूअल आवश्यक. आपल्या बँकेला **Auto Debit** सूचना देऊन ॲटोमेटीक रिन्यूअल होऊ शकते. बहुसंख्य बँकांत सोय उपलब्ध.
- सार्वजनिक बँका व अन्य बँका (उदा. **ICICI, AXIS, IDBI**) आणि जनरल इन्शुरन्स कंपन्या यांच्या वतीने संयुक्तपणे योजना राबवली जाते.
- या योजनेत फक्त अपघात झाल्यासच (नैसर्गिक मृत्यूसाठी नाही)नुकसानभरपाई मिळते. विमा ग्राहकाचा **(Insured Person)** मृत्यू झाल्यास रु.२ लाख. दोन डोळे, दोन हात किंवा दोन पाय कायमस्वरुपी गमावल्यास रु. २ लाख, एक डोळा, एक हात, किंवा एक पाय गमावल्यास रु. १ लाख विमा रक्कम मिळेल.
- या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही सरकारी बँकेत **(Nationalised Bank)** अथवा अन्य व्यापारी बँका अथवा अन्य व्यापारी बँका उदा. **ICICI, AXIS, IDBI** इ.आपले बचत खाते असणे आवश्यक आहे.
- एका व्यक्तीने स्वत:ची अनेक बचत खाती असली तरी एकाच बचत खात्यातून हा विमा उतरवायचा आहे. एका पेक्षा जास्त खात्यातून विमा उतरवल्यास भरलेला हप्ता जप्त होऊन पॉलीसी रद्द होईल.

***

# प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना

कोणासाठी उपयोगी – सर्वसामान्य आर्थिक परिस्थितीतील कष्टकरी लोकांना त्यांच्या उतारवयात आर्थिक तरतूद करण्यासाठी उपयुक्त असलेली योजना. या योजनेत आयुष्याचा विमा उतरवला जात असल्याने **(Life Insurance)** विमाधारकाचा कोणत्याही कारणाने मृत्यू झाला (नैसर्गिक मृत्यूसहीत) तरी त्याच्या वारसांना विम्याची रक्कम मिळते. सम अॅश्युअर्ड किंवा रीस्क कव्हरेज हे रु.२ लाख प्रती विमाधारक असे निश्चीत केले आहे.

योजनेची माहिती –

- ही अत्यंत कमी प्रिमीयममध्ये व निश्चित दराच्या प्रिमीयम मध्ये उपलब्ध असलेली एकमेव लाईफ इन्शुरन्स योजना आहे. प्रती वार्षिक फक्त रु.३३०/- (अधिक लागू दराने सर्व्हिस टॅक्स) एवढाच हप्ता भरावा लागेल. त्यात सर्वांना दोन लाख रुपयांची विमा सुरक्षा मिळेल.
- ही विमा योजना फक्त १८ ते ५५ वयोगटातील व्यक्तींना उपलब्ध.
- विम्याची टर्म (मुदत) ही पूर्वनिश्चित अशी १ जून ते ३१ मे अशीच राहणार आहे. केव्हाही या योजनेत दाखल झाले तरी चालेल, फक्त पहिले वर्ष दाखल झाल्यानंतरच्या ३१ मे रोजी संपेल.
- ऑटो रिन्युअल व ऑटो डेबीटची सोय उपलब्ध आहे. आपले बचत खाते असलेल्या बँकेला तशी स्थायी सूचना दिल्यास बँक आपल्या खात्याला ऑटो डेबीट करुन विमा हप्ता पुढील वर्षासाठी भरेल व आपली विमा पॉलीसी पुढील एक वर्षासाठी रिन्यू होईल.
- या योजनेखाली रु.२ लाखाचे लाईफ कव्हरेज मिळेल. विमा पॉलीसी सुरु असताना कोणत्याही कारणाने विमा धारकाचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसांना रु.दोन लाख इतकी नुकसान भरपाई विमा कंपनीकडून मिळेल. **(Life Insurance Companies)**
- ही योजना सर्व सरकारी व अन्य बँका उदा. **ICICI, AXIS, IDBI** इ. बँका व आयुर्विमा कंपन्या यांच्याकडून संयुक्तपणे राबवली जाते.
- या योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही सरकारी बँकेत **(Nationalised Bank)** अथवा अन्य व्यापारी बँका उदा. **ICICI, AXIS, IDBI** इ. आपले बचत खाते असणे आवश्यक आहे.

***

# अटल पेन्शन योजना

कोणासाठी उपयोगी – असंघटीत क्षेत्रातील कामगार, छोटे व्यावसायिक, कष्टकरी महिला, पुरुष व ज्यांना आपल्या उतारवयासाठी काही तरतूद करुन ठेवण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी ही अतिशय परवडणारी योजना आहे. आपल्या कार्यक्षम आयुष्यात अत्यंत कमी रकमेची गुंतवणूक मासिक हप्त्यांमध्ये करुन आपल्या उतारवयातील उदरनिर्वाहाची काळजी दूर करण्याची संधी या योजनेद्वारे सामान्य जनतेसाठी उपलब्ध करुन दिली आहे.

योजनेची माहिती –

- ज्यांचे बँकेत खाते आहे अशा १८ ते ४० वयोगटातील कोणत्याही व्यक्तीला या योजनेत सहभागी होता येते.
- दरमहा ४२ रुपये भरणाऱ्या १८ वर्षाच्या व्यक्तीला त्याच्या वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यावर दरमहा रु.१०००/- इतके पेन्शन मिळू शकते. याच पध्दतीने दरमहा २१० रुपये भरल्यास रु.५०००/- इतकी पेंशन मिळू शकते. अशा प्रकारचे वय व रकमेनुसारचे चार्ट बँकेत उपलब्ध आहेत, त्यानुसार आपण आपली पेन्शन ठरवू शकतो.
- जून २०१५ ते डिसेंबर २०१५ पर्यंत उघडलेल्या खात्यांमध्ये योजनेच्या पहिल्या पाच वर्षांत केंद्र सरकार या योजनेत जास्तीत जास्त रु.१०००/- प्रती व्यक्ती – प्रती वर्ष योगदान करणार आहे. त्यामुळेच कमी रकमेच्या हप्त्यात जास्त रकमेची पेन्शन मिळणे शक्य होणार आहे. डिसेंबर २०१५ नंतर योजना चालू आहे मात्र सरकारचे कॉन्ट्रीब्यूशन नसेल.
- योजना सर्व राष्ट्रीयकृत बँका व अन्य बँकांत (उदा. **ICICI, AXIS , IDBI** इ.) उपलब्ध आहे. आपले बचत खाते त्या बँकेत असणे आवश्यक आहे.
- या योजनेतील दरमहाची रक्कम बँकेला **Auto Debit** सूचना देऊन भरता येते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे बँक चार्जेस लागत नाहीत.
- ही योजना पेंशन फंड रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ऑथॉरीटी (**PFRDA**) या वैधानिक संस्थेच्या नॅशनल पेंशन स्कीम(**NPS**) अंतर्गत येते, त्यामुळे या योजनेला संपूर्ण सुरक्षा आहे.

***